# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः01.04.2024 वारःबुधवार

---

1. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराला वेग
2. कल चाचण्यांचे अहवाल दर्शवण्यावर निवडणूक आयोगाची बंदी
3. उन्हाची काहिली कमी करण्यासाठी पुरेसा वीजपुरवठा उपलब्ध करुन देण्याचे सरकारचे प्रयत्न
4. तैवानमध्ये 7 पुर्णांक 7 रिख्टर तिव्रतेचा भूकंप आणि
5. छत्रपती संभाजीनगरमध्ये इमारतीला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातल्या सात जणांचा मृत्यु

**<u>प्रचार</u>**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराला आता वेग आला आहे. पहिल्या टप्प्यातील निवडणूक मतदानाच्या अनुषंगाने, प्रमुख राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते विविध राज्यांमध्ये झंझावाती प्रचार करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल राजस्थानमध्ये भाजपाची पहिली प्रचारसभा घेतली. भाजपने 2 हजार 14 आणि 2 हजार 19 मध्ये राज्यातील सर्व 25 जागा जिंकल्या होत्या, यावेळीही त्याचीच पुनरावृत्ती होईल असा विश्वास मोदी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गोविंद सिंग दोतासरा, माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी पाली आणि जोधपूरमध्ये पक्षाच्या उमेदवारांच्या अर्ज भरण्यासाठी आयोजित पदयात्रेला संबोधित केलं. मनमोहनसिंग सरकारच्या काळातील कामं आणि गेल्या 10 वर्षातील कामांची तुलना करावी असं दोतासरा यांनी यावेळी सांगितलं.

**<u>एक्झिट पोलबंदी</u>**

आगामी निवडणूक कालावधीत निवडणूक अंदाज किंवा कल चाचण्यांचे अहवाल दर्शवण्यावर निवडणूक आयोगानं बंदी घातली आहे. राज्यात पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होणार असून 16 मार्चपासूनच आचारसंहिता लागू झाली आहे. राज्यात 19 एप्रिल रोजी सकाळी सात वाजल्यापासून 1 जून रोजी सायंकाळी साडे सहा वाजेपर्यंतच्या कालावधीत एक्झिट पोलसाठी प्रतिबंध लागू राहणार आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्यातील मतदान संपण्याच्या आधी 48 तासाच्या कालावधीत कल चाचणी अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असं निवडणूक आयोगाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

**<u>मिथक-वास्तव</u>**

आगामी लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर चुकीची माहिती पसरवण्यावर निर्बंध घालण्यासाठी मिथक आणि वास्तव यांच्यातील सत्यता पडताळणीसाठी नोंदणी करण्याची सुविधा निवडणूक आयोगानं उपलब्ध करुन दिली आहे. अशी माहिती आयोगानं काल जारी केलेल्या पत्रकांत देण्यात आली आहे. सार्वत्रिक निवडणूकीदरम्यान योग्य आणि अचूक माहिती मतदारांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं हे रजिस्टर मदत करणार आहे. समाजमाध्यमांवर यापुर्वी पसरवण्यात आलेल्या चुकीच्या माहितीबाबत खुलासा करणं, निवडणूकीसंदर्भात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना उत्तरं देणं आणि संबंधितांपर्यंत खरी माहिती पोहोचवण्याचं काम या रजिस्टरच्या माध्यमातून केलं जात आहे.

**<u>प्रसारण-धोरण</u>**

राष्ट्रीय प्रसारण धोरण 2024 कसं असावं यासंदर्भातील सल्लापत्र दूरसंचार प्राधिकरण अर्थात ट्रायनं काल जारी केलं. भारतीय अर्थव्यवस्थेला वाढीमध्ये हातभार लावण्यासाठी दुरसंचार क्षेत्रात मोठी क्षमता आहे. अशी माहिती दुरसंचार मंत्रालयानं काल दिली. नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या युगात प्रसारण क्षेत्राचा नियोजित विकास आणि वाढीसाठी

भविष्यातील नियोजन, उद्दिष्टं आणि धोरणं निश्चित करणं हा सुचना मागवण्याचा उद्देश आहे. राष्ट्रीय प्रसारण धोरण-2024 तयार करण्यासाठीचं हे पत्रक 30 एप्रिलपर्यंत सामान्य नागरिकांकडून सल्ला आणि हरकती मागवण्यासाठी तयार करण्यात आलं आहे.

**राजनाथ सिंह-कमांडर परिषद**

उत्तरेकडील सीमांवरील सद्य परिस्थितीत सैन्याला माघारी बोलावणे आणि तिथला तणाव कमी करणे हाच एकमेव उपाय असल्याचं केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हंटलं आहे. ते काल नवी दिल्लीत, सेना दलांच्या कमांडर परिषदेला संबोधित करत होते. देशाचं सैन्य पूर्णपणे सतर्क राहून, देशाचं रक्षण करत असल्यामुळे शांततामय मार्गाने सुरु असलेल्या वाटाघाटी सुरु राहतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. देशाच्या पश्चिम भागातील सीमांवर सैन्य आणि सुरक्षा दल करत असलेल्या प्रयत्नांची त्यांनी यावेळी प्रशंसा केली. परिषदेदरम्यान, सुरक्षा सद्यस्थिती, सीमेवरील परिस्थिती आणि विद्यमान आव्हानं या सर्व पैलूंवर चर्चा करण्यात आली.

**विजेची-मागणी**

चालू उन्हाळी हंगामात वाढती विजेची मागणी पूर्ण करण्याच्या उद्देशानं सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं उर्जामंत्री आर के सिंग यांनी काल सांगितलं. आगामी काही दिवसांतील तापमानवाढ लक्षात घेता विद्युतपूरवठा खंडीत होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या उद्देशानं काल नवी दिल्ली इथं झालेल्या बैठकांमध्ये चर्चा करण्यात आली. देशभरातील औष्णिक उर्जा निर्मिती प्रकल्पातील औष्णिक क्षमतेची जास्तीत जास्त उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या उद्देशानं वीज गळतीच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. वीज उत्पादक कंपन्यांसोबतही काल बैठक झाली. अद्याप अकार्यान्वित 5 पुर्णांक 2 गिगावॅट औष्णिक उर्जा क्षमतेच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी वीजेची मागणी वाढणार असल्याच्या पार्श्वभूमीवर या बैठका महत्वाच्या मानल्या जात आहेत.

**भूकंप**

तैवानच्या तैपै शहराला आज पहाटे भूकंपाचा 7 पूर्णांक 7 रिख्टर क्षमतेचा झटका बसला. चीनच्या शांघायसह अनेक प्रांतांना देखील हा धक्का जाणवला. तायवानच्या समुद्रात त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे. तैपैमधील वीज पुरवठा खंडित झाला असून वाहतूक ठप्प झाली आहे. अधिक तपशिलाची प्रतीक्षा आहे.

**आरबीआय**

भारतीय अर्थव्यवस्था आत्मनिर्भर बनवणं आणि विकसित भारत बनवण्यासाठी भारतीय रुपया जगभरांत पोहोचवणं आणि त्याला मान्यता मिळणं आवश्यक आहे. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडेच सांगितलं होतं. त्या अनुषंगानं भारतीय रिझर्व बँकेनं अलीकडच्या काळात भारतीय रुपयाचा वापर जागतिक बाजारपेठांमध्ये लोकप्रिय करण्यासाठी, विशेषत: व्यापार क्षेत्रात व्यवहारासाठी महत्वपूर्ण पावलं उचलली आहेत. स्थिरता आणि व्यवहारासाठी कमी खर्च यासारख्या सुविधांसह, RBI नं 22 देशांतील बँकांना भारतीय रुपयांमध्ये रक्कम देण्यासाठी विशेष व्होस्ट्रो रुपी खाती उघडण्याची परवानगी दिली आहे.

**आरबीआय**

सर्व बँकांनी फिनटेक कंपन्यांचा प्रभाव आणि अवलंबित्व कमी करावं, कर्ज सुविधा उपलब्ध करुन देताना आणि त्यासंदर्भातील जोखीमीची किंमत फिनटेक कंपन्यांच्या माध्यमातून मोजावी लागणार नाही याची खात्री करावी अशा सूचना भारतीय रिझर्व बँकेचे उपगव्हर्नर एम राजेश्वर राव यांनी केल्या. मुंबईत नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात ते बालत होते. बँका आणि वित्तिय संस्था फिनटेक भागीदारांद्वारे ग्राहकसंख्या वाढवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत याचा अर्थ बँकिंगसंदर्भातील नियेजित मानकं कमी करणे असा होत नाही. असंही ते म्हणाले.

**इस्राईल हल्ला**

इस्रायलच्या सशस्त्र दलाने काल गाझामधील वर्ल्ड सेंट्रल किचन या मानवतावादी गटाच्या ताफ्यावर 'अनवधानाने' हल्ला केला, असं इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी म्हटलं आहे. या हल्ल्यात सहा मदत कर्मचारी आणि

पॅलेस्टिनी चालक ठार झाला. या घटनेची जबाबदारी इस्रायलचं संरक्षण दल-आय डी एफ ने स्वीकारली आहे.  या घटनेबद्दल आपल्याला आत्यंतिक शोक झाला आहे, अशा शब्दांत नेतान्याहू यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, वर्ल्ड सेन्ट्रल किचनने गाझामध्ये अन्न मदत वितरीत करण्याचे कार्य स्थगित केले.

**बदल्या**

निवडणूक आयोगानं आसाम, बिहार, झारखंड, ओडिशा आणि आंध्र प्रदेश मधील जिल्हा दंडाधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस महानिरीक्षक आणि उपमहानिरीक्षकांच्या बदल्या करण्याचे आदेश दिले आहेत. आयोगाकडून होणाऱ्या नियमित कार्यपध्तीचा भाग म्हणून हे निर्णय घेण्यात आल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बदली झालेल्या अधिकाऱ्यामध्ये आसाम मधील उदलगीरीचे जिल्हादंडाधिकारी, बिहारमधील भोजपूरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक, आणि नावडाचे पोलीस अधीक्षकांचा समावेश आहे. या सर्व अधिकाऱ्यांनी आपापल्या कनिष्ठ सहकाऱ्यांकडे कामाची सुत्र सुपूर्द करावीत आणि निवडणूक कालावझी संपेपर्यंत कोणत्याही निवडणूक प्रक्रियेतील कामात सहभागी होऊ नये असे निर्देश आयोगानं दिले आहेत. संबंधित राज्य सरकारांनी आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या नावांची यादी आयोगाकडे पाठवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**आग-छ.संभाजीनगर**

महाराष्ट्रात, छत्रपती संभाजीनगरमध्ये तीन मजली इमारतीला लागलेल्या भीषण आगीमध्ये एकाच कुटुंबातल्या सात जणांचा मृत्यु झाला. ही दुर्घटना आज पहाटे 3 च्या सुमारास घडली असुन, यामध्ये तीन महिला आणि दोन मुलांचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातल्या नागरिकांनी बचावकार्य करण्याचा प्रयत्न केला तसंच पोलिस आणि अग्निशमन दलानं घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत सात जणांचा मृत्यू झाला होता. मृतदेह शासकीय घाटी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. पोलीस अधिक तपास करत असुन, आगीचं कारण अद्याप कळलेलं नाही.

**भारत्तोलन**

भारत्तोलानात, आय डब्ल्यू एफ विश्वअजिंक्यपद स्पर्धेत, भारताच्या बिन्द्रयानी देवी हिने, महिलांच्या 59 किलो वजनी गटात कास्य पदक पटकावलं. थायलंड मधील फुकेत इथे ही स्पर्धा सुरु आहे. याच स्पर्धेत, 113 किलो वजनी गटात, क्लीन अँड जर्क प्रकारात रौप्यपदक मिळवलं. तत्पूर्वी, दुखापतीनंतर, सहा महिन्यांनी स्पर्धेत उतरलेल्या भारताच्या मीराबाई चानूला 49 किलो वजनी गटात 12 व्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार